सोमवार, दि. ९ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १८८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शिक्षणाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा पाया भक्कम करावा - महापौर वंदनाताई मगरे

### आत्मविश्वास, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे महिलांना कोणतेही ध्येय गाठणे शक्य- मनोज कोल्हे

**जालना । प्रतिनिधी -** महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणामुळे महिलांना आत्मविश्वास, स्वावलंबन आणि समाजात समान संधी मिळतात. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देत महिला सक्षमीकरणाचा पाया अधिक भक्कम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जालना शहर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती वंदनाताई मगरे यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, जालना तसेच गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ''बेटी बचाव बेटी पढाओ'' अंतर्गत स्टेशन रोडवरील जिल्हा परिषद प्रशालेत आयोजित तालुकास्तरीय माता व किशोरी मेळाव्याचे उद्घाटन महापौर वंदनाताई मगरे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर नगरसेविका संध्याताई देठे व श्रीमती मंगलाताई गरदास, गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे , नोडल अधिकारी डॉ. रवींद्र काकडे, केंद्रप्रमुख, सुनिल ढाकरके, अरुण देशमुख, अरुण जाधव, ओम देशमुख, भागवत जेटेवाड,श्रीमती बनकर यांची उपस्थिती होती. यावेळी महापौर वंदनाताई मगरे म्हणाल्या की, आजच्या बदलत्या काळात मुलींनी शिक्षणाच्या बळावर विविध क्षेत्रात यश संपादन केले आहे. कुटुंब, समाज आणि देशाच्या विकासात महिलांचे योगदान मोठे असून मुलींना शिक्षण, आरोग्य व सुरक्षिततेच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे. गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे म्हणाले की, आजच्या बदलत्या जागतिक परिप्रेक्ष्यात महिलांसाठी शिक्षण, उद्योग, तंत्रज्ञान आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत असून विद्यार्थिनींनी या संधींचा योग्य प्रकारे उपयोग करून आपले भविष्य उज्ज्वल करावे. नगरसेविका संध्या देठे, नगरसेविका मंगला गरदास यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विविध विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. ॲड. कल्पना त्रिभुवन, श्याम चव्हाण आणि संजय सोनवणे,राजेंद्र साळवे यांनी महिलांचे हक्क, बालकांचे संरक्षण, करिअर मार्गदर्शन तसेच महिला सुरक्षा या विषयांवर उपस्थित माता व किशोरींना मार्गदर्शन केले. यावेळी संवाद अनुभव कथन सत्रात श्रीमती सुनीता जाधव व श्रीमती योगिता खांडेकर यांनी आपल्या जीवनातील प्रेरणादायी अनुभव सांगत महिलांना स्वावलंबी होण्यासाठी प्रेरित केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने गांधी चमनपर्यंत विद्यार्थ्यांच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात बेटी बचाव बेटी पढाओ घोषणानी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थिनींनी मुलीचे शिक्षण, पालकांची जबाबदारी, जागरूकता, सामाजिक भान कर्तव्य या विषयी पथनाट्य सादर केले. या प्रसंगी कविसंमेलनाचेही आयोजन करण्यात आले होते. कवी संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून रेखा गतखने यांची उपस्थिती होती तर डॉ. सुहास सदाव्रते यांनी कवी संमेलनाचे सूत्रसंचालन करत शाळाविषय कविता सादर केली. प्रभाकर शेळके यांनी हिंदू कोडं बिल व स्त्रीविषय, अशोक खेडेकर यांनी काय पाहिजे ही गझल, प्रदीप घाटेशाही यांनी रमाईचा त्याग, कैलास भाले यांनी माझी माय, श्रीमती रेखा गतखणे यांनी खरंच जीवन सुंदर आहे,श्रीमती शुभांगी लामधाडे यांनी स्त्रीजीवन व कु. कांचन थोरवे फुले दांपत्य विषयी आपल्या काव्यरचनांद्वारे महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला.

या मेळाव्यास तालुक्यातील मोठ्या संख्येने माता, किशोरी तसेच शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महिला व बालविकास विभाग आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्नेहा बनकर, भागवत जेटेवाड, दिलिप राठोड, अरुण जाधव, मधुकर राठोड, प्रदीप घाटेशाही, जितेंद्र कांबळे, प्रियंका गड्डापवार यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रदीप घाटेशाही यांनी केले व आभार सुनिल ढाकरके यांनी मानले.



## मंदिरावर दगडफेक; सकल हिंदुत्ववादी संघटनांकडून तीव्र निषेध

### दोषींवर कठोर कारवाईची मागणी तसेच अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल करा



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील गाव मारुती मंदिर परिसरात काही असामाजिक तत्वांकडून दगडफेक करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. घटनेमुळे स्थानिक नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून मंदिराची विटंबना झाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेचा सकल हिंदुत्ववादी संघटनांकडून तीव्र निषेध करण्यात आला आहे. धार्मिक स्थळावर अशा प्रकारची घटना घडणे अत्यंत गंभीर असून हा समाजातील शांतता व सखोलता बिघडविण्याचा प्रयत्न असल्याचे संघटनांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन पोलीस प्रशासनाने सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करावा व कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी सकल हिंदुत्ववादी संघटनांनी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये या साठी मारुती मंदिर परिसरात कायमस्वरूपी पोलीस सुरक्षा व्यवस्था करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

जर या प्रकरणात तातडीने कारवाई झाली नाही तर सकल हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### आखाती तणावाचा जालन्यातील स्टील उद्योगावर परिणाम

## स्टील महागण्याची शक्यता, बांधकाम खर्च वाढणार

### कच्च्या मालाच्या आयातीवर परिणाम होण्याची शक्यता

**जालना । प्रतिनिधी -** आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण युद्धस्थितीचा परिणाम आता जालन्यातील स्टील उद्योगावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कच्च्या मालाच्या आयातीवर तसेच इंधन व वाहतूक खर्चावर परिणाम झाल्यास जालन्यात तयार होणाऱ्या स्टीलच्या किमती वाढण्याची शक्यता उद्योग क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे. परिणामी याचा थेट परिणाम बांधकाम क्षेत्रावरही होऊ शकतो.

स्टील सिटी ऑफ इंडिया अशी ओळख असलेल्या जालना औद्योगिक वसाहतीतून दरवर्षी सुमारे ४.५ मिलियन टन स्टील सळईचे उत्पादन केले जाते. या उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर स्क्रॅप आणि आयर्न या कच्च्या मालाची आवश्यकता असते. देशातील जवळपास १० टक्के स्क्रॅपची आयात जालन्यात केली जाते. तसेच उर्वरित कच्चा मालही जगातील विविध देशांतून आयात केला जातो.

हा कच्चा माल प्रामुख्याने स्ट्रेट ऑफ होर्मुज मार्गे भारतात पोहोचतो. मात्र सध्या आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे या मार्गावरील वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती स्टील उद्योग क्षेत्रात व्यक्त केली जात आहे. त्याचबरोबर स्टील उद्योगासाठी लागणारा कोळसाही मोठ्या प्रमाणावर



आयात केला जात असल्याने त्यावरही या परिस्थितीचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

दरम्यान भारतातील जवळपास निम्मे कच्चे तेल स्ट्रेट ऑफ होर्मुज मार्गे आयात केले जाते. या मार्गावरील तणाव वाढल्यास क्रूड ऑइलच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यानंतर डिझेल-पेट्रोलचे दर वाढल्यास वाहतूक खर्चात मोठी वाढ होऊ शकते. वाहतूक खर्च वाढल्यास त्याचा थेट परिणाम स्टील उत्पादन खर्चावर होऊन बाजारात स्टील सळईच्या किमती वाढण्याची शक्यता वर्तविली जात असल्याची प्रतिक्रिया घनश्याम गोयल, संचालक कालिका स्टील व अध्यक्ष स्टील उद्योग समूह, जालना यांनी दिली.

स्टीलच्या किमती वाढल्यास त्याचा परिणाम केवळ उद्योग क्षेत्रापुरता मर्यादित राहणार नाही. मोठ्या पायाभूत प्रकल्पांसह स्वतःचे घर बांधण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनाही त्याचा आर्थिक फटका बसू शकतो. कारण स्टील महागल्यास बांधकामाचा एकूण खर्च वाढणार आहे. एकूणच आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम जालन्यातील स्टील उद्योग, बांधकाम क्षेत्र आणि सर्वसामान्यांच्या खिशावर होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने उद्योग क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अशोक नायगावकर यांना दु:खी तर मीनाक्षी पाटील यांना ना. धों. महानोर राज्य पुरस्कार घोषित।

**जालना । प्रतिनिधी -** येथील स्व. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि अनुभव प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध उर्दू शायर कै. राय हरिश्चंद्र साहनी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा दु:खी राज्यकाव्य पुरस्कार ठाणे येथील प्रसिद्ध कवी अशोक नायगावकर यांना जाहीर झाला आहे .पुरस्काराचे यंदा २८ वे वर्ष असून २५ हजार रुपये रोख , स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच ना. धों. महानोर राज्य पुरस्कार कवयित्री तथा ललित लेखिका मीनाक्षी पाटील ( मुंबई) यांना घोषित झाला आहे.१० हजार रुपये रोख , स्मृती चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून येत्या गुढीपाडव्यास गुरुवारी (ता.१९) सायं.७.00 वा. जालना येथे कवितेचा पाडवा या गाजलेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

रविवारी ( ता. ०८) संयोजक अभय साहनी, विनीत साहनी, लेखिका, कवयित्री डॉ. संजीवनी तडेगांवकर, अनुभव प्रतिष्ठान चे सचिव पंडितराव तडेगांवकर यांनी पत्रकार परिषदेत पुरस्काराची घोषणा केली.




पुरस्कार वितरणानंतर निमंत्रित कवींची सुरेल काव्यमैफल रंगणार आहे. रसिकांनी गौरवशाली साहित्यिक उपक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकातर्फे करण्यात आले आहे. दरम्यान यापूर्वी बलवंत धोंगडे, वृषाली किन्हाळकर, कैलास भाले, फ.मु.शिंदे ,स्व.भगवान देशमुख , रामदास फुटाणे, इंद्रजीत भालेराव ,निरजा, मनोज बोरगावकर लोकनाथ यशवंत, विष्णू सूर्या वाघ, राजन गवस, प्रज्ञा दया पवार, अरुणा ढेरे,रेखा बैजल, दासू वैद्य आदी दिग्गज कवी ,साहित्यिकांना पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

### विपूल काव्य, साहित्य संपदा...!

विनोदी कवी अशोक नायगावकर यांचे वाटेवरच्या कविता-१९९२ आणि कवितेच्या वाटेवर -२०२२ कवितासंग्रह प्रकाशित आहे. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कवितांचे सादरीकरण केले असून कवितेची नायगावकरी विनोदी शैली प्रसिद्ध आहे. कवी, चित्रकार, ललित लेखिका मीनाक्षी पाटील यांचे ''इज इट इन युअर डीएनए'' ''ललद्यदस् ललबाय'' हे कवितासंग्रह '' उत्तर आधुनिकता आणि मराठी कविता'' (समीक्षा ग्रंथ) ''खानदेशी म्हणी व वाक्प्रचार :एक लोकाभ्यास'' आणि ''साधन डायरी'' हे अनुवादित ग्रंथ प्रकाशित आहेत.

## जागृत दक्षिणमुखी घनतृप्त हनुमान बारागाड्या उत्सव समिती अध्यक्षपदी बाबासाहेब वानखेडे

### सचिवपदी रामेश्वर सुरसे, कार्याध्यक्ष चरणदास महंत, उपाध्यक्ष भगवान गाडेकर, संदीप वानखेडे, म्हसुजी वानखेडे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रामनगर येथील आराध्य दैवत जागृत घनतृप्त हनुमान बारागाड्या उत्सव समिती अध्यक्षपदी बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे यांची एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी उत्सव समितीच्या उर्वरीत कार्यकारिणीत सचिवपदी रामेश्वर सुरसे, कार्याध्यक्षपदी चरणदास महंत, उपाध्यक्षपदी भवगान गाडेकर, म्हसुजी वानखेडे, संदीप वानखेडे यांची एकमताने निवड झाली. २ एप्रिल २०२६ गुरूवार रोजी जागृत दक्षिणमुखी घनतृप्त हनुमान मंदिरसमोर दुपारी ५ वाजता बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी आ.अर्जुनराव खोतकर,मा.आ. कैलाश गोरंट्याल, भास्कर पा.दानवे, भास्करराव अंबेकर, उपमहापौर राजेश राऊत, डॉ. विशाल धानुरे, अमोल धानुरे, विष्णु पाचफुले, ॲड.बी.एम. कुलकर्णी, भगवानराव गाडेकर, सुरेश रत्नपारखे, धनराज लोंढे पाटील, शंकर वानखेडे, पांडुरंग वानखेडे, वैजीनाथ नागरे, भागुजी वानखेडे, संतोष वानखेडे, निलेश वानखेडे, रामु वानखेडे, अशोक वाघमारे, म्हसुजी वानखेडे, बाबासाहेब सोनवणे, रामेश्वर खांडेभराड, परमेश्वर खांडेभराड , पंढरीनाथ सोळुंखे,सागर राऊत, अशोक मेहेत्रे, अशोक वाघमारे, अरूण शिवाजी वानखेडे, भगवान येवले अंहकार देऊळगांव, गणेश सोमधाने, हरिभाऊ वानखेडे, सिताराम रोडगे, राम रोडगे, शिवलाल घाडगे, नितीन तायडे, संतोष गायकवाड, शिवराम सुरसे, गोकुळ स्वामी, कृष्णा बाबासाहेब वानखेडे यांनी योगदान दिले आहे.



# संपादकीय पान

## नियमांपेक्षा कोणीही मोठा नाही

लोकशाही व्यवस्थेचा पाया हा कायद्याचे राज्य आणि पारदर्शक प्रशासन या तत्त्वांवर उभा असतो. शासनातील कोणतीही व्यक्ती किंवा पद कितीही मोठे असले तरी ती व्यक्ती कायद्यापेक्षा मोठी नसते, हा लोकशाहीचा मूलभूत सिद्धांत आहे. मात्र जालना जिल्ह्यातील अलीकडील घडामोडींनी या तत्त्वालाच आव्हान दिल्याचे चित्र समोर आले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या कार्यपद्धतीबाबत दाखल झालेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने कारणे दाखवा नोटीस बजावल्याने प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी येणारा निधी, मंजूर होणाऱ्या योजना आणि विविध विकासकामे ही जनतेच्या कराच्या पैशातून राबवली जातात. त्यामुळे त्या प्रक्रियेत नियमांचे काटेकोर पालन आणि पारदर्शकता असणे अत्यावश्यक असते. परंतु काही निर्णय विशिष्ट हेतूने आणि नियमांचे उल्लंघन करून घेतले जात असल्याच्या तक्रारी गेल्या काही काळापासून पुढे येत होत्या. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने घेतलेली दखल ही केवळ प्रशासकीय निर्णयावर प्रश्नचिन्ह नसून संपूर्ण व्यवस्थेला दिलेला इशारा मानावा लागेल. प्रशासन आणि राजकारण यांचे नाते नेहमीच संवेदनशील असते. प्रशासन हे नियमांनुसार काम करणारे आणि राजकीय नेतृत्व हे धोरणात्मक दिशा देणारे असे दोन्ही घटक वेगळे असले तरी अनेकदा राजकीय दबावामुळे प्रशासकीय निर्णयांवर प्रभाव पडल्याच्या तक्रारी ऐकायला मिळतात. जालना प्रकरणातही अशाच प्रकारचा आरोप समोर आल्याने या मुद्द्याचे गांभीर्य अधिक वाढले आहे. न्यायालयाने नोटीस बजावली याचा अर्थ अंतिम निर्णय झाला असे नाही, परंतु प्रथमदर्शनी काही प्रश्न उपस्थित झाले आहेत, हे निश्चित लोकशाहीत न्यायपालिका ही सत्तेच्या तीन स्तंभांपैकी एक महत्त्वाची संस्था आहे. जेव्हा कार्यकारी यंत्रणेच्या निर्णयांवर शंका निर्माण होते, तेव्हा न्यायालय हस्तक्षेप करून कायद्याचे राज्य कायम ठेवण्याचे काम करते. त्यामुळे या प्रकरणात न्यायालयाने घेतलेली भूमिका ही केवळ एका जिल्ह्यापुरती मर्यादित नसून प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारी यांची आठवण करून देणारी आहे. या प्रकरणातून एक मोठा संदेश स्पष्ट होतोसत्ता कोणाकडेही असो, नियमांच्या चौकटीत राहूनच निर्णय घ्यावे लागतात. जनतेच्या पैशावर आणि अधिकारांवर कोणाचाही एकाधिकार नसतो. सत्तेचा उपयोग विकासासाठी आणि जनहितासाठी व्हायला हवा; अन्यथा न्यायव्यवस्था हस्तक्षेप करून उत्तरदायित्वाची जाणीव करून देते. जालना प्रकरणातील पुढील सुनावणी काय निकाल देते, हे येत्या काळात स्पष्ट होईल. मात्र या घटनेने प्रशासन आणि राजकीय नेतृत्व या दोघांनाही एक महत्त्वाचा धडा दिला आहे लोकशाहीत सत्ता ही सेवा करण्यासाठी असते, मनमानी करण्यासाठी नव्हे.

# स्वाभिमानाची प्रेरणा देणारे महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला. संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले. त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली. औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला. औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता. कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला. त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला. त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले. परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली.यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते.परंतु वतनाच्या मुद्द्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला.यालाच म्हणतात ''घर का भेदी लंका ढाये''१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही. त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली. परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रुरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रृरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?''याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती. शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# घरात क्रॉस किंवा येशूची मूर्ती असणे हे ख्रिस्ती धर्मांतराचा आधार होऊ शकत नाही

## मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

केवळ घरात पवित्र क्रॉसचे चित्र किंवा प्रभू येशू ख्रिस्ताची मूर्ती आढळल्यास, त्या व्यक्तीने किंवा त्याच्या पूर्वजांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे, असे गृहीत धरता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नुकताच दिला आहे. या निकालामुळे जात पडताळणी समित्यांच्या मनमानी कारभाराला चाप बसला असून, नागरिकांच्या वैयक्तिक श्रद्धेचा आणि गोपनीयतेच्या अधिकाराचा सन्मान राखला गेला आहे, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केले आहे. न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर आणि न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांच्या खंडपीठाने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा एक वादग्रस्त आदेश रद्दबातल ठरवत हा निर्णय दिला.या प्रकरणात, जिल्हा जात पडताळणी समितीने एका व्यक्तीला मांग किंवा मातंग या अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्यास नकार दिला होता. समितीने असा दावा केला होता की, अर्जदाराच्या आजोबांच्या शाळेच्या दाखल्यावर त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याची नोंद आहे. तसेच, अर्जदाराच्या घरात पवित्र क्रॉसचे चित्र आढळल्याने त्यांनी धर्मांतर केले आहे, असा निष्कर्ष समितीने काढला होता. मात्र, अर्जदाराच्या कुटुंबातील इतर सदस्यांकडे सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवलेले जात प्रमाणपत्र होते. अर्जदाराने न्यायालयासमोर स्पष्ट केले की, शाळेत होणाऱ्या त्रासामुळे आजोबांना दुसऱ्या शाळेत दाखल करण्यात आले होते, जिथे चुकून त्यांच्या नावासमोर ख्रिस्ती अशी नोंद झाली. वस्तुस्थिती अशी होती की, त्यांच्या कुटुंबातील कोणीही किंवा त्यांच्या पूर्वजांनी कधीही ख्रिस्ती धर्म स्वीकारला नव्हता.उच्च न्यायालयाने या प्रकरणाची सखोल चौकशी केली असता, असे निदर्शनास आले की, जात पडताळणी समितीने केवळ घरातील धार्मिक चिन्हांच्या आधारावर निर्णय दिला होता. समितीने अर्जदाराच्या पूर्वजांचा किंवा कुटुंबातील कोणत्याही सदस्याचा बाप्तिस्मा झाल्याचा कोणताही ठोस पुरावा तपासला नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की, धर्मांतरासाठी बाप्तिस्म्यासारखे धार्मिक विधी पार पडल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे. केवळ घरात एखाद्या देवतेचे चित्र किंवा मूर्ती असणे, हे त्या व्यक्तीच्या धर्मांतराचा निर्णायक पुरावा असू शकत नाही. हा निव्वळ श्रद्धेचा किंवा सजावटीचा भाग असू शकतो.न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की, ''अर्जदाराचे वडील किंवा आजोबा यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे, असा निष्कर्ष काढण्यापूर्वी जात पडताळणी समितीने बाप्तिस्म्याचे विधी पार पडले होते की नाही, याची खात्री करणे बंधनकारक होते. केवळ घरात क्रॉसचे चित्र किंवा प्रभू येशू ख्रिस्ताची मूर्ती आढळल्याने अर्जदाराच्या पूर्वजांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता, असे मानणे चुकीचे आहे.'' २६ फेब्रुवारी रोजी दिलेल्या या निकालात न्यायालयाने समितीच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. अर्जदाराच्या कोणत्याही रक्तनातेवाईकाने ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याचा किंवा त्यांच्याकडे मांग जातीच्या प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य कोणतेही प्रमाणपत्र असल्याचा कोणताही पुरावा समिती सादर करू शकली नाही.अखेरीस, उच्च न्यायालयाने जिल्हा जात पडताळणी समितीचा २७ सप्टेंबर २०२३ रोजीचा आदेश पूर्णपणे रद्द केला आणि अर्जदाराला मांग जातीचे प्रमाणपत्र त्वरित जारी करण्याचे निर्देश दिले. या निकालामुळे, जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या अनेक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ॲड. धनावत यांनी या निर्णयाचे स्वागत करत म्हटले आहे की, यामुळे समित्यांच्या अधिकारांचा गैरवापर थांबेल आणि नागरिकांना त्यांच्या घटनात्मक हक्कांपासून वंचित ठेवण्याचे प्रकार कमी होतील. या प्रकरणात याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. यू. जे. देशपांडे यांनी, तर सरकारच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील एन. आर. पाटील यांनी बाजू मांडली.

# शेळी व मेंढीसारखे जीवन किती दिवस जगायचे?

बऱ्याच लोकांना दुसऱ्यांसोबत भांडण तंटे व वादविवाद करायला नको वाटते. असे लोक त्यांची चुकी असो अथवा नसो, ते दुसऱ्यांसोबत वादविवाद करायला अथवा त्यांना तोंड द्यायला धाडसाने सामोरे जात नाहीत. म्हणजे ते दुसऱ्यांसोबत वादविवाद घालायला जरा घाबरतात असेच म्हणावे लागेल.

त्यामुळेच की काय? बहुतांश माणसे आपल्यावर अन्याय जरी होत असला तरी ते त्या अन्यायाचा प्रतिकार करण्याऐवजी मुकाट्याने अन्याय सहन करत असतात. त्यांना जणू अन्याय सहन करण्याची सवयच लागलेली असते. भांडण तंटे व वादविवाद करून कशाला कोर्ट कचेरी व पोलीस स्टेशनच्या पायऱ्या चढायच्या, कशाला स्वतःचे आर्थिक, शारीरिक व मानसिक नुकसान करून घ्यायचे आणि उगीच कशाला दुसऱ्यांसोबत वादविवाद घालून त्यांच्यासोबत अबोला धरायचा. या कारणास्तव बरीच माणसे भांडण तंटे करायचे जाणीवपूर्वक टाळतात. मित्रांनो, या जगात कोणीच कोणाला कमी नसतो. प्रत्येकात ताकत, राग व हिंमत ठासून भरलेली असते. फरक एवढाच असतो की, कोणी तडकाफडकी प्रतिकार करण्याचा निर्णय घेतो, तर कोणी जरा संयम ठेवून प्रतिकार करण्यास पुढे सरसावतो. परंतु जे घाबरट लोक असतात, ते मात्र मुकाट्याने अन्याय व अत्याचार सहन करतात. प्रत्येकजण स्वाभिमानी व अभिमानी असतो. स्वतःच्या स्वाभिमानाला ठेच लागली तर माणसाच्या तळपायाची आग मस्तकाला जाते, माणूस प्रचंड संतापून जातो, त्याचा स्वाभिमान त्याला शांत बसू देत नाही.

तो लगेच उठून अन्यायाचा प्रतिकार करायला लागतो. परंतु आजकालचा माणूस स्वतःवर कितीही अन्याय होत असला तरी एवढा गप्पगार का बसत आहे? एवढा अन्याय सहन करूनही त्याच्यातील स्वाभिमान जागा का होत नाही? हे प्रश्न मला राहून राहून पडतात. कारण आजकाल या धरतीवर चांगल्या माणसांचा वावर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. चांगली माणसे वाईट माणसाच्या नादाला लागून स्वतःचे नाव कशाला खराब करून घेतील? चिखलावर दगड धोंडा मारून स्वतःच्या अंगावर चिखलाचे शिंतोडे कशाला उडवून घेतील? चांगल्या माणसांना माहीत असते की, वाईट माणसांच्या नादी लागल्यावर लोक आपल्याला वेड्यात काढतील. वाईट माणसांना समाजात व गावात कोणीच किंमत देत नसतो. चांगली माणसे वाईट माणसांपासून चार हात लांब राहतात. कारण की, त्यांना समाजात कवडीचाही मानपान नसतो. म्हणून आपण अशा बावळट माणसांच्या नादी लागल्यावर आपल्या देखील अब्रूला व स्वाभिमानाला ठेच पोहोचू शकते. म्हणून आपण अशा बावळट व वेडसर लोकांच्या नादी लागून आपला मान सन्मान कमी का करायचा? असा विचार आजकालची सुज्ञ व जाणकार माणसे का करत नाहीत? मित्रांनो हल्ली या जगात समोरचा जसा आपल्या सोबत व्यवहार करतो, त्याच पद्धतीने आपण देखील त्याच्यासोबत तसाच व्यवहार केला पाहिजे. एखादा आपल्याला कठोर शब्दात बोलत असेल तर आपण देखील त्याला त्याच भाषेत बोलले पाहिजे. समोरचा आपल्याला जीवापाड जपत असेल, आपल्याला जीव लावत असेल, आपली किंमत करत असेल तर आपण देखील त्याला जीवापाड जपले पाहिजे व त्याच्या चांगल्या आणि वाईट काळात धावून गेले पाहिजे. समोरचा आपल्याला काहीही बोलत असेल, सार्वजनिक ठिकाणी आपला अपमान करत असेल, नाहक आपल्याला बदनाम करत असेल आणि आपल्या अंगावर मारण्यासाठी धावून येत असेल तर अशा लोकांना त्यांच्यासारखेच बनून त्यांच्यापासून होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे. तरच ती माणसे नीट वागतील. फक्त गरज आहे ती, त्यांना त्यांच्यासारखेच कठोर व आक्रमक बनून त्यांना सबक शिकवण्याची..माझ्या मते अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा मोठा गुन्हेगार समजला जातो. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला अगोदरच सांगून ठेवले आहे. बांधवांनो, जीवन जगायचे असेल तर वाघ बनून वाघासारखे जीवन जगा, शेळी व मेंढीसारखे जीवन जगण्यापेक्षा वाघासारखे जीवन जगा. आपण जेवढा अन्याय व अत्याचार सहन कराल, तेवढा जास्त अन्याय अत्याचार आपल्यावर होत असतो. समोरचा शेर असेल तर आपण सव्वाशेर होऊन जीवन जगले पाहिजे. ज्यांना माराची गरज असते, ती माणसे शब्दांनी नाही सुधारत. म्हणतात ना, लातोंके भूत बातोंसे नहीं मानते. त्यांना बोलून काहीच फायदा नसतो, त्यांना योग्य वेळी मार देऊन त्यांना चांगला सबक शिकवलाच पाहिजे, तरच ती माणसे माणसांसोबत माणसासारखा व्यवहार करतील. त्यासाठी माणसाला योग्य वेळी राग येणे फार गरजेचे आहे. नाही तर राग न आल्याचा लोक फायदा घेतात. हे आपण अगोदर लक्षात घेतले पाहिजे. तुम्ही तापट बनून समोरच्यावर चालून नाही गेलात आणि नुसता अन्याय सहन करत राहिलात तर दिवसेंदिवस तुमच्यावर अन्याय करण्याची त्याची वृत्ती वाढत जाणार. म्हणून आपण अन्यायाला वेळीच लाथाडून लावले पाहिजे. आणि स्वाभिमानाला जिवंत ठेवले पाहिजे. मित्रांनो या जगात आपल्यावर पदोपदी अन्याय, अत्याचार होत असतो. आपल्या भारत भूमीत अनेक महापुरुष व समाजसुधारक होऊन गेले. त्यांना पदोपदी अन्याय सहन करावा लागला. परंतु ते आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला कधीच घाबरून गेले नाहीत तर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वेळीच प्रतिकार करण्याचे धाडस त्यांनी दाखवले आहे. अन्यायाचा प्रतिकार करता करता आपला जीव जरी गेला तरी आपल्याला वीर मरण आले म्हणून समजा. अन्याय सहन करून मारण्यापेक्षा अन्यायाचा प्रतिकार करून मेला तर ते अधिक चांगले होईल. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, शिवपुत्र संभाजी राजे, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीमाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महापुरुषांना पदोपदी अन्याय, अत्याचार सहन करावा लागला आहे. या महापुरुषांनी आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला हिंमतीने व धाडसाने जबरदस्त चपराक मारली आहे. म्हणूनच शेवटी व्यवस्थेला सुद्धा यांच्यापुढे लोळण घ्यावी लागली. आपल्या महापुरुषांनी इथली हजारो वर्षापासून चालत आलेली जुलमी व अन्यायी राजवट नेस्तनाबूत करण्यासाठी आपले प्राण पणाला लावले आणि इथली जुलमी राजवट खिळखिळी करून टाकली. या महापुरुषांनी अन्यायाचा प्रतिकार केला म्हणून व्यवस्थेला सुद्धा त्यांच्यापुढे झुकावे लागले. म्हणून समस्त बहुजन जनतेला मी सांगू शकतो की, बाबांनो अजून किती दिवस अन्याय, अत्याचार सहन करायचा. आणखी किती दिवस भीत भीत जीवन जगायचे. आपण अन्यायावर प्रतिकार करायला कधी शिकणार? महापुरुषांचा जीवन लढा व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला त्यांनी कसा प्रतिकार केला व स्वतः कसे स्वाभिमानाने जगले? हे कधी जाणून घेणार? याचा विचार प्रत्येकाने करून होता होईल तेवढा आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचार लाथाडून लावण्यासाठी आपण समर्थ असले पाहिजे...तरच आपण वाघासारखे जीवन जगले म्हणून समजा... नाहीतर शेळी होऊन जीवन जगण्यात काहीच अर्थ नाही....

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

जागतिक महिला दिनानिमित्त चंदनझीरा वस्तीतील शिक्षणाची ज्योत; मुख्याध्यापिका शुभांगी यमुल यांचे प्रेरणादायी कार्य

# महिला सक्षमीकरणाचा देत आहेत मजबूत संदेश

**जालना । प्रतिनिधी -** आज जागतिक महिला दिनानिमित्त देशभरात महिलांच्या कार्याचा गौरव केला जात आहे. जालना शहरातील चंदनझीरा परिसरात शिक्षणाचा दिवा पेटवत अनेक मुलांच्या आयुष्यात बदल घडवणाऱ्या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा तथा मुख्याध्यापिका श्रिमती शुभाःगी यमुल मडम आज आपल्या सोबत आहेत. गरीब,मजूर आणि कामगार कुटुंबातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्या सातत्याने काम करत आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल आणि महिला सक्षमीकरणाबद्दल आज आपण त्यांच्याशी विशेष



संवाद साधला आहे. आज जागतिक महिला दिनानिमित्त चंदनझीरा या वस्तीमध्ये शिक्षणाची ज्योत पेटवत अनेक मुलांचे भविष्य घडवणाऱ्या स्वर्गीय गिरिश यमुल बहुद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या अध्यक्ष तथा श्री विठ्ठल प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगी यमुल मडम यांच्या कार्याबद्दल आपण जाणून घेतले. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी महिलांची भूमिका किती महत्त्वाची आहे हे त्यांच्या कार्यातून दिसून येते. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अशा प्रेरणादायी तमाम महिलांना सलाम

# सुंदरनगरमध्ये कचऱ्याचा डोंगर; नागरिक त्रस्त, स्वच्छता निरीक्षकांचा निष्काळजीपणा उघड

महिनो-महिने कचरा न उचलल्याने दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव; रहिवाशांचा संताप, महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १२ मधील सुंदरनगर परिसरात राबीया मस्जिदच्या बाजूला मागील अनेक महिन्यांपासून कचऱ्याचा भला मोठा ढिग साचलेला होता. महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी महिनो-महिने हा कचरा उचलला नसल्यामुळे हा ढिग दिवसेंदिवस वाढत गेला आणि परिसरातील नागरिकांसाठी मोठे संकट बनला.

कचऱ्याच्या या ढिगामुळे परिसरात मोकाट कुत्रे व जनावरे मोठ्या प्रमाणात फिरू लागली. तसेच डास व माश्यांची उत्पत्ती वाढून दुर्गंधी पसरत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. या सततच्या त्रासाला कंटाळून शनिवारी रात्री उशिरा अज्ञात व्यक्तीने या कचऱ्याच्या ढिगाला आग लावल्याची घटना घडली. त्यामुळे निर्माण झालेला धूर बाजूला असलेल्या वस्ती व घरांमध्ये शिरल्याने नागरिकांना पुन्हा मोठा त्रास सहन करावा लागला.

महानगरपालिकेने उघड्यावर कचरा जाळण्यास कडक बंदी घातली असून महानगरपालिका अधिनियमांनुसार अशा प्रकारे कचरा जाळल्यास दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. मात्र प्रश्न असा निर्माण होत आहे की, महापालिकेच्या स्वच्छता विभागाने वेळोवेळी कचरा उचलला असता तर नागरिकांना अशी टोकाची पावले उचलण्याची वेळच आली नसती.

विशेष म्हणजे प्रभाग क्र. १२ मधील स्वच्छता निरीक्षक या भागात अनेक दिवसांपासून फिरकलेच नसल्याचे या प्रकारावरून दिसून येत आहे. त्यांच्या दुर्लक्षामुळेच कचऱ्याचा ढिग वाढत गेला आणि नागरिकांना दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि आता धुराचा त्रास सहन करावा लागला. त्यामुळे स्वच्छता निरीक्षक आणि दरम्यान, या गंभीर प्रकारानंतर तरी महानगरपालिका प्रशासन संबंधितावर कारवाई करणार का आणि परिसरातील



संबंधित कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. कचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# श्रीनिवास तोतला याचे सीए अंतिम परीक्षेत देदीप्यमान यश

**जालना । प्रतिनिधी** - श्रीनिवास नितीन तोतला याने इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट्स ऑफ इंडियातर्फे घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. अवघ्या २३ व्या वर्षी त्याने मिळवलेले हे यश जालना शहराच्या शैक्षणिक वैभवात भर घालणारे ठरले आहे. श्रीनिवास हा जालन्यातील नामांकित सीए ॲड. नितीन तोतला आणि ॲड. अर्चना तोतला यांचा सुपुत्र आहे. आई-वडिलांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांनी घालून दिलेल्या शिस्तीच्या बळावर श्रीनिवासने हे यश प्राप्त केले आहे. श्रीनिवासने केवळ सीए परीक्षेतच नव्हे, तर यापूर्वी जागतिक पातळीवरील कठीण मानली जाणारी फायनान्शिअल रिस्क मॅनेजर (एफआरएम) ही परीक्षाही उत्तीर्ण केली आहे. ग्लोबल असोसिएशन ऑफ रिस्क प्रोफेशनल्सतर्फे घेण्यात येणारी ही परीक्षा उत्तीर्ण होणारा तो जालन्यातील पहिला विद्यार्थी ठरला होता. आता सीए फायनलमध्ये यश मिळवून त्याने आपल्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब केले आहे. श्रीनिवासचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, त्याने पुण्यातील नामवंत सिम्बायोसिस कॉलेजमधून बी.कॉम. पदवी पूर्ण केली. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्याने व्यावसायिक अभ्यासक्रमात आपले लक्ष केंद्रित केले होते. जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर त्याने एकापाठोपाठ एक ही दोन मोठी शिखरे सर केली आहेत. श्रीनिवासच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर आयटीआयमध्ये विभागीय तंत्र प्रदर्शनाचा जल्लोष; ७४ नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे सादरीकरण

# ''नोकरी शोधू नका, नोकरी देणारे उद्योजक बना'' उद्योजक सुनीलजी रायठठ्ठा यांचे प्रशिक्षणार्थ्यांना प्रेरणादायी आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), जालना येथे दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय तंत्र प्रदर्शन मोठ्या उत्साहात व उद्योगाभिमुख वातावरणात पार पडले. मराठवाड्यातील विविध आयटीआय संस्थांमधून आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनी सादर केलेल्या ७४ नाविन्यपूर्ण प्रकल्पांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजक सुनीलजी रायठठ्ठा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभागाचे सहसंचालक प्रदीप दुर्गे, उद्योजक नितीनजी काबरा, आयएमसी सदस्य डॉ. विठ्ठल पवार, श्रीमती ज्योती माने, ज्ञानेश्वर काळे, चे प्रतिनिधी तसेच चे पदाधिकारी उपस्थित होते. संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रवीण उखळीकर, उपप्राचार्या श्रीमती तृप्ती भोपे, श्रीमती रजनी शेळके आणि मराठवाड्यातील सर्व आयटीआय प्राचार्य यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.

मार्गदर्शन करताना सुनीलजी रायठठ्ठा यांनी प्रशिक्षणार्थ्यांना उद्योगाभिमुख विचारसरणी आत्मसात करण्याचे आवाहन केले. ''फक्त नोकरी मिळवण्याच्या विचारात न राहता स्वतः उद्योग उभारून इतरांना रोजगार देणारे बना,'' असा संदेश देत त्यांनी 'मॅजिक' संस्थेच्या माध्यमातून प्रकल्पांचे उद्योगात रूपांतर करण्याचे मार्गदर्शन केले. आयटीआयमधून घडलेल्या यशस्वी उद्योजकांच्या कथा त्यांनी सांगत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

सहसंचालक प्रदीप दुर्गे यांनी उद्योग समूहांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करत जालना आयटीआयला स्टील असोसिएशनकडून मिळालेल्या विशेष गौरवाचा उल्लेख केला. सर्व सहभागी प्रशिक्षणार्थ्यांचे कौतुक करत त्यांनी मराठवाड्यातील अधिकाऱ्यांच्या कार्याचे अभिनंदन केले. **७४ प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण** अभियांत्रिकी, नाविन्यपूर्ण आणि नॉन-इंजिनिअरिंग अशा तीन गटांमध्ये एकूण ७४ प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. उद्योगाभिमुख, तांत्रिक कौशल्य दाखवणारे आणि सामाजिक उपयुक्तता असलेले प्रकल्प विशेष आकर्षण ठरले. सदर तंत्र प्रदर्शनात तीन गटांमध्ये प्रत्येकी तीन पारितोषिके देण्यात आली. सर्व मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना प्रशस्तीपत्र व ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या.

**इंजिनिअरिंग गट**

प्रथम क्रमांक: इलेक्ट्रिक सायकल जिजाऊ आयटीआय परभणी

द्वितीय क्रमांक: रेफ्रिजरेटर कम कंडिशनर देवगिरी आयटीआय छ. संभाजीनगर.

तृतीय क्रमांक: शंकरपाळे कटर स्व. विनायकराव मेटे आयटीआय बीड

**नाविन्यपूर्ण प्रोजेक्ट गट**

प्रथम क्रमांक: रिवॉल्विंग लेथ सेंटर देवगिरी आयटीआय छ. संभाजीनगर

द्वितीय क्रमांक: डिटेक्शन लेपर्ड अँड डिटेक्टर एसएमएस अलर्ट एससीपी आयटीआय छ. संभाजीनगर.

तृतीय क्रमांक: ऑटोमॅटिक स्ट्रीट लाईट कंट्रोल आयटीआय नांदेड

**नॉन-इंजिनिअरिंग गट**

प्रथम क्रमांक: मॅजिक ऑफ ड्रेस मेकिंग आयटीआय परतूर

द्वितीय क्रमांक: बेसिक कॉस्मेटोलॉजी अँड प्रोडक्शन आयटीआय परभणी

तृतीय क्रमांक: जर्नी फ्रॉम फायबर टू फॅब्रिकेट ड्रेस आयटीआय लातूर यांनी पटकावला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रवीण उखळीकर यांनी केले. आभार प्रदर्शन उपप्राचार्या श्रीमती रजनी शेळके यांनी तर सूत्रसंचालन श्याम चव्हाण यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेतील अधिकारी, गटनिदेशक, शिल्पनिदेशक, कर्मचारी व प्रशिक्षणार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले. एकूणच विभागीय तंत्र प्रदर्शन प्रेरणादायी, कौशल्यवर्धक आणि उद्योगाभिमुख वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाले.

'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान' अंतर्गत सामाजिक योजना शिबिर उत्साहात संपन्न

# उसतोड कामगारासाठी विविध योजनाची मेजवानी



**परतुर । प्रतिनिधी -** शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान' अंतर्गत आष्टी व कु. पिपळगाव येथे सामाजिक योजना समाधान शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन माजी मंत्री तथा आमदार मा. बबनराव भाऊ लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी उपजिल्हाधिकारी श्रीमती मनीषा दांडगे, उपजिल्हाधिकारी डॉ. पद्माकर गायकवाड, तहसीलदार दामोदर जाधव, परतुर गटविकास अधिकारी श्री. राजेश तागडे, गटशिक्षणाधिकारी डॉ. भरत वानखेडे, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगरचे प्रकल्प संचालक श्री. अप्पासाहेब उगले, जिल्हा संपर्क अधिकारी भाऊसाहेब गुजाळ, जिल्हा समन्वयक एकनाथ राउत, सोमेश्वर सोनटक्के तसेच स्वयंसेवक राजेश वाघमारे, महादेव खरात, आकाश चांगुले, योगेश आढे, सुरेखा वाघमारे, दुर्गा नाडे, बँक मित्र नारायण कनसे, रघुनाथ टेकाळे, सुनील वाहुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये परतुर व घनसावंगी तालुक्यातील उसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध शासकीय योजनांची माहिती देऊन प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. आरोग्य व पोषण मार्गदर्शन, प्रमाणपत्रे, आयुष्मान भारत कार्ड, आधार कार्ड केवायसी, बँक विमा योजना, रोजगार हमी कार्ड, रेशन कार्ड दुरुस्ती, कृषी सौर पंप योजना तसेच बाल संगोपन योजनेसाठी अर्ज भरून घेण्यात आले.

या शिबिरात उसतोड कामगारांच्या कुटुंबीयांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ३२० लाभार्थींनी सहभाग नोंदविला.

या उपक्रमामुळे स्थलांतरित उसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यास मोठी मदत होत असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# जालना जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१

**जालना । प्रतिनिधी -** महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान'' टप्पा १ आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत आयोजित शिबीरादरम्यान प्रत्येक गावातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनातील सर्व यंत्रणा प्रयत्न करणार आहेत असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

दि. ५ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे जिल्हाभरात दि. ७ मार्च २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्वव समाधान शिबीर अभियान टप्पा १ च्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, प्रभारी उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सुकेशिनी कांबळे-पगारे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणार असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्वव समाधान शिबिरांच्या माध्यमातून शासनाकडून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण योजना तसेच लोकाभिमुख प्रशासनासाठी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय व योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शिबीरा दरम्यान प्रत्येक गावातील नागरिकांच्या महसूल व इतर शासकीय योजनांशी संबंधित प्रलंबित समस्या या शिबिरांच्या माध्यमातून तात्काळ सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी संबंधित गावातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या, अडचणी, तक्रारी ह्या मंडळ अधिकारी यांच्याकडे देणे बंधनकारक राहील. संबंधित मंडळात ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरांचे आयोजन केले जाणार आहे त्या दिवशी संबंधित विभागाचे अधिकारी या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. तसेच या शिबीरा दरम्यान महाराष्ट्र शासनाकडून जालना जिल्ह्यात एकूण ६५ ठिकाणी ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर'' आयोजित करण्यात येणार असून मंडळ स्तरावर या शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक शिबिरात महसूल, ग्रामविकास, पंचायत राज, सामाजिक न्याय, कृषी, आरोग्य आदी विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या अर्जांची तात्काळ दखल घेतील. ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत मंडळ व नगर परिषद/ नगर पंचायत स्तरावर राबविण्यात येणार असून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचे महसूल विषयक प्रश्न तात्काळ निकाली काढणे हा प्रमुख उद्देश आहे. प्रत्येक तालुक्यात एकदिवसीय समाधान शिबिरे आयोजित करून प्रलंबित फेरफार, ७/१२ दुरुस्ती, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे यांसारख्या सेवा 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' तत्त्वावर देण्यात येणार आहेत.अभियानाच्या पूर्वतयारीत गावनिहाय प्रलंबित प्रकरणांची यादी तयार करून शिबिरापूर्वी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी. ७/१२ व ८अ उताऱ्यांचे अद्ययावतीकरण, डिजिटल ७/१२ ची जनजागृती, तसेच एकवेळच्या अधिमूल्य भरणा पद्धतीबाबत नागरिकांना मार्गदर्शन करावे. तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणे, संपादन व अकृषी परवानगी नोंदींची अद्ययावत माहिती शिबिरात उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले. तसेच 'एक खिडकी व्यवस्था' प्रभावीपणे राबवून सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहतील .शिबिरांची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे व दवंडीचा वापर करण्यात येणार आहे.

✻अभियानातंर्गत शिबीरांची पूर्व तयारी करण्यासाठीच्या मार्गदर्शक सुचना : अ) शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार भोगवटदार वर्ग २ जमिनी भोगवटदार वर्ग १ मध्ये परावर्तित करण्यात आल्या किंवा नाहीत याची तपासणी मंडळ स्तरावर करणे व अशा काही जमिनी वर्ग १ मध्ये परावर्तित करणे बाकी असल्यास त्याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुर्वतयारीच्या कालावधीत प्रक्रिया पुर्ण करावी व अद्यावत नोंदीसह ७/१२ लाभार्थ्यांना वितरीत करावे. ब) जिवंत ७/१२ मोहिमेअंतर्गत यापुर्वीच शासनामार्फत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व गावा मध्ये ७/१२ वाचन पूर्ण करून प्रलंबीत नोंदीच्या याद्या तयार कराव्या व त्याअनुषंगाने दुरूस्तीबाबत कार्यवाही शिबीरापुर्वी पुर्ण करून घेणे. शिबीरात अद्यावत अभिलेख अर्जदारांना उपलब्ध करून द्याव्या. क) सामाजिक अर्थसहाय्य योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे अर्ज शिबीरापुर्वी भरून घेणे व समितीच्या बैठकीचे आयोजन करून लाभ मंजुर करून घ्यावे व शिबीरात मंजुरी आदेशाचे वितरण करावे. ड) तुकडेबंदी कायद्याविरूध्द दिनांक १५.११.१९६५ ते १५.१०.२०२४ पर्यंत प्रमाणभूत सीमेपेक्षा कमी क्षेत्राच्या जमीनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार व हस्तांतरण बाबत गावनिहाय यादी तयार करावी. इ) नोंदणीकृत दस्ताचे आधारे रद्द झालेली, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लघंनामुळे ७/१२ मधील इतर अधिकारातील खरेदीदारांचे नाव, इतर अधिकारात नोंदविलेले शेरे, तसेच नव्याने प्राप्त अर्जाविषयी फेरफार घेणे. अनोंदणीकृत व्यवहाराविषयी गाव निहाय माहिती गोळा करून नोंदणीकरीता नोंदणी विभागाकडे पाठविणे. ७/१२ अद्यावत करून शिबीराच्या दिवशी अद्यावत ७/१२ चे वाटप करावे ई) मंडळ स्तरावरील सर्व शाळांचा आढावा घेऊन दाखले वाटप न झालेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या तयार करणे. शाळेमध्ये वर विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज भरून घेणे. शिबीराच्या दिवशी दाखल्यांचे वाटप करावे. उ) उपविभागीय स्तरीय समितीने शासन निर्णय क्र.लवेसू२०२५/प्र.क्र.०२/ पाणंद रस्ते, दिनांक १४/१२/२०२५ नुसार शिर्बीर आयोजित करावायाच्या मंडळातील पाणंद रस्त्यांची प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्रामपंचायतला उपलब्ध करुन द्यावे. ऊ) मंडळातील सर्वांसाठी घरे अंतर्गत पट्टे वाटपासाठी बाकी राहिलेल्या लाभार्थ्यांची यादी तयार करणे. तसेच संबंधीत शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुर्वतयारीच्या कालावधीत प्रक्रिया पूर्ण करावी व शिबीरात पट्टे वाटप करावे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात संपन्न




**घनसावंगी । प्रतिनिधी -** तालुका घनसावंगी मधील कुंभार पिंपळगाव या महसूल मंडळात आज महसूल विभागा अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा १ हे नागरिकांच्या प्रचंड प्रतिसादात उत्साहात संपन्न झाले.

शिबिरास तालुक्यातील सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहून नागरिकांच्या अर्ज स्वीकारून नागरिकांना प्रत्यक्ष सेवेचा लाभ दिला. यावेळी तहसीलदार रमेश पागोटे, नायब तहसीलदार संतोष इथापे, सोमनाथ तोतला, मोनाली सोनवणे, उपअधीक्षक भूमिअभिलेख बिदरकर, दुय्यम निबंधक मनीषा पैठणे, मंडळ अधिकारी प्रविण गजरे, ज्ञानेश्वर चौरे, ग्राम महसूल अधिकारी महेंद्र साळव, एन एम येवतीवाड, भरत बारसे, गंगाधर जाधव, मंडळ कृषी अधिकारी श्री लोंढे, सहायक कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी सुनील खोडदे, आरोग्य अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी इ सह मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या अभियानात एकूण १३८९ नागरिकांना लाभ देण्यात आले. तहसीलदार श्री पागोटे यांनी शिबिराबाबत सविस्तर माहिती दिली. श्रीमती मोनाली सोनवणे यांनी आभार मानले.

# महिला दिनानिमित्त जालन्यात मुस्कान ज्यूस सेंटरचे गोड उपक्रम; ५०० ग्लास ज्यूसचे मोफत वाटप





**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनानिमित्त जालना शहरात एका तरुण व्यावसायिकाने स्त्रीशक्तीचा सन्मान करत अनोखा आणि कौतुकास्पद उपक्रम राबवला. शहरातील वीर सावरकर चौक येथील मुस्कान ज्यूस सेंटरच्या वतीने महिलांसाठी तब्बल ५०० ग्लास ज्यूसचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमामागे मुस्कान ज्यूस सेंटरचे चालक शेख वसीम शेख रहिम यांची संकल्पना आहे. सध्या उन्हाचा पारा चांगलाच चढू लागला असून तापमान ४० अंश सेल्सियसच्या पुढे गेले आहे. या पार्श्वभूमीवर महिला दिनाचे औचित्य साधत ज्यूस सेंटरवर येणाऱ्या महिलांना दिवसभर मोफत थंडगार ज्यूस देण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ज्यूस सेंटरवर येणाऱ्या अनेक महिलांनी या उपक्रमाचे कौतुक करत शेख वसीम यांचे आभार मानले. दिवसभरात ५०० ग्लास ज्यूस वाटप करण्याचा संकल्प त्यांनी केला असून त्याची सुरुवात सकाळपासूनच करण्यात आली.

महिला दिनानिमित्त स्त्रीशक्तीचा सन्मान करण्यासाठी जालन्यात राबविण्यात आलेला हा छोटासा पण मनाला स्पर्श करणारा उपक्रम नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. समाजात महिलांविषयी आदर व्यक्त करण्यासाठी अशा सकारात्मक उपक्रमांची गरज असल्याचेही अनेकांनी यावेळी नमूद केले.

# जालन्यातील महिलांसाठी खास मेजवानी

## तीच्या भावनांचा आणि कवितेचा अनोखा सोहळा!

**जालना । प्रतिनिधी -** स्त्रियांचे जगणे, त्यांचे सुख-दुःख आणि त्यांच्या मनातील भावनांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी जालन्यात एक अतिशय सुंदर कार्यक्रम होत आहे. निमित्त आहे जागतिक महिला दिनाचे! येथील जेईएस महाविद्यालयाच्या वतीने सोमवार, ९ मार्च रोजी तीच्या अवकाशात हा विशेष काव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा केवळ कविता वाचण्याचा कार्यक्रम नाही, तर प्रत्येक स्त्रीला हे तर माझ्याच मनातील आहे असे वाटायला लावणारा हा सोहळा आहे. आपल्या दैनंदिन आयुष्यात आपण जे अनुभवतो, जे सोसतो आणि ज्या स्वप्नांचा पाठलाग करतो, त्याच भावनांचे दर्शन या मैफिलीत घडणार आहे.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवयित्री या कार्यक्रमात आपल्या कविता सादर करणार आहेत:

प्रिया धारूरकर (छत्रपती संभाजीनगर): स्त्रीच्या मनातील भावविश्व अतिशय सुंदर शब्दांत मांडण्यात त्यांचा हातखंडा आहे.

मनीषा अतुल (नागपूर): स्त्रीचा संघर्ष आणि तिचे समाजातील स्थान यावर त्या पोटतिडकीने लिहितात आणि बोलतात.

संगीता अरबुने (वसई): आई, घर आणि नात्यांमधील हळवेपणा त्यांच्या कवितांमधून थेट काळजाला भिडतो.

आपल्या अस्तित्वाचा आणि आपल्या शब्दांचा हा सोहळा अनुभवण्यासाठी जालन्यातील सर्व महिला आणि रसिक प्रेक्षकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री आणि स्माईल समितीच्या वतीने केले आहे.

# परतूर येथील विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे जागतिक महिला दिन साजरा

**परतूर । प्रतिनिधी -** विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये जागतिक महिला दिन मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला होता.

यासाठी अध्यक्ष म्हणून विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा बाहेकर मॅडम लाभल्या होत्या.

शाळेतील मुलींनी स्वतः च्या हातानी तयार केलेले बुके तसेच भेट वस्तू महिला शिक्षिका ना भेट दिल्या. तसेच शाळेतील बोर्ड डेकोरेशन हाताने तयार केलेल्या ग्रीटिंग कार्ड ने साजविले होते.

तसेच वर्ग १ ते ४ च्या मुली भारतातील कर्तबगार महिलाच्या वेधभूशेत आल्या होत्या.

तसेच शाळेच्या वतीने महिलांच्या कार्याचा गौरव म्हणून सत्कार करण्यात आला.

महिला ना आज आनंद मिळण्यासाठी शाळेतील मुलींनी महिला साठी वेगवेगळ्या खेळा चे आयोजन केले होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थापक, संदीप बाहेकर.प्रिंसिपल ,चाको. प्रिंसिपल ,दंदाले. व महाजन यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तापडिया मॅडम, काकलीस मॅडम, अंभुरे मॅडम, राऊत. गोरे. बाहुते. शिंदे. यांनी सहकार्य केले.



# आठशे रणरागिणींच्या वॉकथॉनने रचला नवा इतिहास; जालन्याच्या रस्त्यांवर अवतरले साडी परंपरेचे इंद्रधनुष्य

## सीईओ मित्रू, वंदना मगरे, संगीता गोरंट्याल, सुधीर लातुरे यांच्या उपस्थितीने वाढविला महिलांचा उत्साह





**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्यावतीने आयोजित साडी वॉकथॉनने रविवारी जालना शहरात नवा इतिहास रचला. महाविद्यालयीन तरुणींपासून ते ६५ वर्षांच्या आजींपर्यंत तब्बल ८०० महिलांनी पारंपरिक सहावारी आणि नऊवारी साड्या परिधान करून या उपक्रमात सहभाग नोंदविला. महिलांच्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे जालन्याच्या रस्त्यांवर जणू साडी परंपरेचे इंद्रधनुष्यच अवतरले होते.

रविवार दि. ८ मार्च रोजी सकाळी ६.३० वाजता हॉटेल सेफ्रान येथून या वॉकथॉनला प्रारंभ झाला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांनी हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ केला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी प्रांतपाल सुधीर लातुरे, सौ. संगीता लातुरे, महापौर वंदना मगरे, माजी नगराध्यक्ष सौ. संगीता गोरंट्याल, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू आणि प्रमोद झांजरी हे उपस्थित होते. याप्रसंगी क्लबच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत, सचिव पंकज लड्ढा, प्रकल्प प्रमुख निर्मला साबू, डॉ. तरुणा छाबडा, डॉ. अनुराधा राख, नेहा पाटणी, संगीता गुप्ता यांच्यासह डॉ. सुमित्रा गादिया, डॉ. आरती मंत्री, डॉ. दीपक मंत्री, स्मिता भक्कड, सुनील बजाज, डॉ. नितीन खंडेलवाल, विवेक मणियार आदींची उपस्थिती होती.

हॉटेल सेफ्रानपासून सुरू झालेली ही वॉकथॉन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक, सराफा, टांगा स्टँड, राम मंदिर, मिशन हॉस्पिटल आणि रुक्मिणी गार्डन मार्गे पुन्हा हॉटेल सेफ्रान येथे विसर्जित झाली. मार्गावर विविध रंगांच्या सहावारी, नऊवारी, दक्षिण भारतीय आणि उत्तर भारतीय साड्या परिधान केलेल्या महिलांचे दर्शन शहरवासीयांना घडले. वॉकथॉनसोबतच आयोजित घोषवाक्य स्पर्धेत महिलांनी स्त्रीशक्ती आणि आरोग्यावर आधारित अत्यंत लक्षवेधी संदेश दिले.

सामाजिक बांधिलकी: सीपीआरचे प्रशिक्षण* : केवळ चालणेच नव्हे, तर आरोग्याप्रती जागरूकता निर्माण करण्यासाठी समारोपप्रसंगी महिलांना सीपीआर (जीवन संजीवनी) चे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले. डॉ. कविता लहाने, डॉ. चंद्रिका मस्के पाटील, डॉ. आरती कुलकर्णी आणि डॉ. ज्योत्स्ना भाले यांनी महिलांना आपत्कालीन स्थितीत प्राण कसे वाचवावे, याचे प्रात्यक्षिक दिले. त्यानंतर वॉकथॉन व घोषवाक्य स्पर्धेतील विविध गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना आकर्षक रोख बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

विविध महिला मंडळांचा सक्रिय सहभाग* : या ऐतिहासिक स्पर्धेत वैयक्तिक सहभागासोबतच शहरातील नामवंत महिला ग्रुप्सनी आपली उपस्थिती दर्शविली. यामध्ये पद्मशाली महिला संघम, एमआरडीए ग्रुप, क्लासिक ग्रुप, अग्रशक्ती ग्रुप, अग्रमाधवी ग्रुप, दिगंबर जैन महिला मंडळ, संमती ग्रुप, पीकॉक क्वीन्स ग्रुप, शकुंतला ग्रुप, मिस युनिव्हर्स ग्रुप, नारीशक्ती ग्रुप, रंग रंगलीया सहेलीया रेनबो ग्रुप, सप्तशक्ती ग्रुप आणि फॅब ग्रुपचा सहभाग होता.

प्रास्ताविक भाषणात डॉ. प्रतिभा श्रीपत म्हणाल्या की, हा उपक्रम केवळ साडी प्रदर्शनाचा नसून महिलांच्या आरोग्याप्रती जागृती आणि भारतीय परंपरेचा सन्मान करण्याचा आहे.

याला मिळालेला प्रतिसाद न भूतो न भविष्यती असाच आहे. निर्मला साबू म्हणाल्या की, दरवर्षी साडी वॉकथॉन आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न राहील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा पाटणी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. तरुणा छाबडा यांनी मानले.

### टी-२० विश्वचषक फायनल

# दहा हजार कोटींच्या सट्टेबाजी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा!

## सुराज्य अभियानाचे तक्रारींना समर्थन

**नागपूर । पणजी -** आज अहमदाबाद येथे भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२६ अंतिम सामन्याच्या पार्श्वभूमीवर देशात चालू असलेल्या १०,००० कोटी रुपयांच्या अवैध सट्टेबाजी रॅकेटचा उलगडा होत आहे. हाय-टेक ॲप्स व ऑफशोअर सर्व्हरद्वारे हा घोटाळा चालवला जात असून, रायबंदर, पणजी येथील जागरूक नागरिक श्री. दिलीप शेट्ये यांनी पणजी पोलीस आयुक्त व पोलीस महासंचालक यांच्याकडे लेखी तक्रार दिली आहे. नागपूर येथे एका जागरूक नागरिकाने इ-मेलद्वारे तक्रार नोंदवली असून, या तक्रारींना हिंदू जनजागृती समितीने जाहीर पाठिंबा दिला आहे. या प्रकरणाची विशेष तपास पथक ()मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी समितीने केली आहे.

काही प्रमुख वृत्तपत्रांत या सट्टेबाजीविषयी वृत्त प्रसिद्ध झाले आहे. खरे तर याची सुमोटो दखल घेऊन पोलीस प्रशासनाने तत्परतेने कारवाई करायला हवी होती. सुराज्य अभियानाने म्हटले आहे की, इतक्या मोठ्या प्रमाणावर चालणारी अवैध सट्टेबाजी भारताच्या जागतिक प्रतिमेला तडा देणारी आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची नाचक्की होत असून भारतीय क्रिकेटची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. खरे तर क्रिकेटच्या निमित्ताने सट्टा-जुगार मोठ्या प्रमाणावर चालतो. हे चालवणारे काही ठराविक लोक असतात, हे तपासयंत्रणांना माहिती असते. अनेक सट्टेबाजांना पकडल्याच्या बातम्या तर येतात; मात्र पुन्हा सट्टाबाजार बिनबोभाट कोणाच्या आशीर्वादाने चालू रहातो, हे शोधण्याची, तसेच छोट्या माश्याऐवजी मोठा मासा पकडण्याची नितांत गरज आहे.

या संदर्भात सुराज्य अभियानाने मागणी केली आहे की, १०,००० कोटींच्या या आकड्याची भीषणता लक्षात घेता, पोलिसांनी तात्काळ संबंधित प्रसारमाध्यमांशी संपर्क साधून या माहितीच्या स्रोताची तपासणी करावी आणि सट्टेबाजांचे नियंत्रण कक्ष उद्ध्वस्त करावेत. जप्त रक्कम जनहिताच्या योजनांसाठी वापरावी. केंद्र सरकारने संमत केलेल्या ऑनलाइन गेमिंग कायदा २०२५नुसार ही कारवाई करावी, ज्यात अवैध सट्टेबाजीला मदत अजामीनपात्र गुन्हा आहे. अंमलबजावणी संचालनालय () व सायबर सेलने हवाला मार्ग व डिजिटल पेमेंट गेटवेज बंद करावेत. स्थानिक बुकी आणि आंतरराष्ट्रीय सिंडिकेट यांच्यातील संबंधांचा शोध घेण्यासाठी राज्य स्तरावर तात्काळ विशेष तपास पथक स्थापन करावे. आपल्या देशाची आणि क्रिकेटची जगभरात बदनामी होऊ नये, यासाठी सामना संपण्यापूर्वीच या रॅकेटवर देशांतर्गत सर्जिकल स्ट्राईक होणे गरजेचे आहे, असे सुराज्य अभियानाने म्हटले आहे. प्रशासकीय पारदर्शकता आणि राष्ट्रीय हितासाठी सुराज्य अभियान या प्रकरणाचा पाठपुरावा करत राहील.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.